महाराष्ट्र शासन

# सहसंचलक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद-४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

इमेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.विकाऔ/शिक्षण/२०२१/ 699 दिनांक : 4 MAR 2021

**<u>अतितात्काळ</u>**

प्रति,

प्राचार्य,

सोबत जोडलेल्या यादीतील संस्था.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांसाठी विद्यार्थ्यांनी भरलेलया परंतु संस्था स्तरांवर ( [illegible] ) प्रलंबित असलेल्या अर्जाच्या तपासणीबाबत. . . . .

संदर्भ :
१. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०१९/५७०, दि.२३/१२/२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/७९, दि.२८/०२/२०२०
३. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१३७, दि.२०/०५/२०२०
४. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१४२, दि.०१/०६/२०२०
५. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१५५, दि.०८/०७/२०२०
६. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/१९०, दि.२६/०८/२०२०
७. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी-पोर्टल/२०२०/३१७, दि.११/०९/२०२०
८. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/ २०२०/३२२, दिनांक २२.०९.२०२०
९. मा.संचालक,या कार्यालयाचे ई-मेल दिनांक १९.०१.२०२१

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनाकरिता विद्यार्थ्यांनी भरलेल्या परंतु संस्था स्तरांवर अर्ज प्रलंबित असल्या कारणाने वारंवार तपासणीस मुदतवाढ देण्यात आली. संदर्भीय पत्रान्वये भरलेले अर्ज निकाली काढण्याबाबत वारंवार सूचना देऊनही दि. ०४.०३.२०२१ च्या डीबीटीपोर्टल डॅशबोर्ड रीपोर्टनुसार संस्था स्तरावरील १५५ अर्ज प्रलंबित दिसून येत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. सोबत डीबीटीपोर्टल डॅशबोर्ड रीपोर्ट जोडलेला आहे. सदर डॅशबोर्ड रीपोर्ट आपल्या लॉगीन आयडीमध्ये देखील उपलब्ध आहे.

तरी याबाबत आपणास कळविण्यांत येते की, महाडीबीटी पोर्टलवर आपल्या संस्थेच्या Login मध्ये प्रलंबित राहिलेले अर्ज योग्य कागदपत्रे जोडलेले असतील तर मंजुरीस्तव पुढे पाठविण्यात यावे अन्यथा अयोग्य असतील तर रिजेक्ट करावे व संस्था स्तरावर एकही अर्ज शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरील कार्यवाही दि.०५.०३.२०२१ रोजी पूर्ण करुन आपल्या संस्थेच्या लॉगिन मध्ये एकही अर्ज शिल्लक नाही यांचे अहवाल या कार्यालयास पत्राद्वारे सादर करावा.

वरील प्रमाणे न केल्यास अथवा विदयार्थी शिष्यव्रत्ती पासून वंचित राहिल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थेची राहिल यांची नोंद घेण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद